पुस्तक परिचय

अरविंद निगळे

## राणीबाग १५० वर्षे : वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान व प्राणिसंग्रहालय




राणीबाग १५० वर्षे : वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान व प्राणिसंग्रहालय- हे मुंबईतील भायखळा येथील उद्यान व प्राणिसंग्रहालयावरील पुस्तक मराठी प्रकाशन विश्वातले मानाचे पान ठरावे एवढे राजबिंडे (रॉयल) आहे, असे म्हटले तर अजिबात अतिशयोक्ती होणार नाही. हुतोक्षी रुस्तमफ्राम व शुभदा निखार्गे या उत्कट निसर्गप्रेमी व चळवळ्या महिलांनी Rani Bagh : 150 Years या नावाने संपादित केलेल्या मूळ इंग्रजी पुस्तकाचा त्यांनीच केलेला हा मराठी अनुवाद आहे. पुस्तकातल्या लेखांच्या सर्वच अनुवादकांनी अनुवाद करताना मराठी भाषेचे जे सौंदर्य मांडले आहे, ते राणीच्या बागेतल्या अप्रतिम सृष्टिसौंदर्याशी स्पर्धा करून 'अमृतातेही पैजा' जिंकणारे आहे. यासाठी त्या अनुवादकांबरोबरच लोकवाङ्मय गृहाचे श्री.जयप्रकाश सावंत व प्रकाश विश्वासराव यांच्यासह संपादकद्वयांपैकी मराठी भाषक शुभदा निखार्गे यांनी जे अपार कष्ट घेतले त्याचे प्रत्यंतर या पुस्तकाच्या पानोपानी येते आणि मराठी भाषेच्या श्रीमंतीने वाचकाच्या मनाला भुरळ पडते.

संपादकद्वयांनी व त्यांच्या आणखी पाच महिला सह-आंदोलकांनी राणीची बाग वाचविण्यासाठी जो संघर्ष केला, त्याचा वृत्तांत या पुस्तकातल्या अखेरच्या लेखात दिला आहे. प्रस्तावनाकार श्री.द.म.सुकथनकर- जे निवृत्त सनदी अधिकारी व मुंबई महानगरपालिकेचे माजी आयुक्त आहेत, ज्यांचे सहकार्य या महिलांना या संघर्षात सदोदित लाभले; त्यांनी या लेखाचा उल्लेख 'या पुस्तकाचा आत्मा' अशा प्रकारे केला आहे. या लेखाच्या सुरुवातीलाच त्या म्हणतात या उद्यानाचे वर्णन उत्तोमत्तम विशेषणांशिवाय करणे शक्यच होत नाही. हे विधान उद्यानाविषयीच्या या पुस्तकालाही तेवढ्याच सार्थपणे लागू पडते.

आपापल्या क्षेत्रात दिग्गज म्हणून ज्यांचा उल्लेख सहज करता येईल, अशा निसर्गनिष्ठांची मांदियाळीच या पुस्तकात विविध लेखांच्या रूपाने एकत्र आली आहे. विख्यात निसर्गप्रेमी व 'सँक्चुअरी एशिया' या मासिकाचे संपादक बिट्टू सहगल यांचा 'राणीची बाग : मुंबईच्या हरित परंपरेची सम्राज्ञी' (अनुवाद : विजय दिवाण), प्रसिद्ध इतिहासतज्ज्ञ श्रीमती मरियम डोसल यांचा 'निसर्गाचा ठेवा, मुंबईचा वारसा : वनस्पती उद्यानाचा आरंभकाल' (अनुवाद : उल्हास राणे), संवर्धन वास्तुकला विशारद विकास दिलावरी यांचा 'निसर्ग आणि वास्तुकला यांचा मिलाफ साधणारा वारसा : अभिजत उद्यानाची रचना आणि स्मारके' (अनुवाद : दीपक घारे), आंतरराष्ट्रीय कीर्तीचे वनस्पतिशास्त्रज्ञ मार्सेलिन आलमेडा यांचा 'राणीच्या बागेतील अवर्णनीय वनसंपदा' (अनुवाद : श्रीपाद कुलकर्णी), राणीबाग वाचविणाऱ्या सह-आंदोलक केटी बगली यांचा 'रंगमंचामागील नाट्य : राणीच्या बागेतील सदाबहार अधिवास' (अनुवाद : शोभना बिजूर), या पुस्तकाचा मुख्य प्रेरणास्रोत असलेल्या नॅशनल सोसायटी ऑफ द फ्रेन्ड्स ऑफ द ट्रीजच्या अध्यक्षा व कला-इतिहासतज्ज्ञ फिरोजा गोदरेज यांचा 'एका आनंददायी

हे पुस्तक केवळ वनस्पती उद्यानासंबंधीचे गोड-गोड सुंदर पुस्तक नसून अगदी मोजक्या जागरूक नागरिक महिलांनी चिकाटीने केलेल्या एका शांततामय व वैधानिक संघर्षाची ही गाथा आहे, म्हणून त्याचे मोल सर्वाधिक आहे. विधायक संघर्षावर विश्वास असणाऱ्या प्रत्येक सामाजिक कार्यकर्त्यास बळ देणारे हे पुस्तक आहे. कार्यकर्त्यांनी व सामाजिक बांधिलकी मानणाऱ्या प्रत्येक सुजाण नागरिकाने हे वाचलेच पाहिजे.

वनस्पती उद्यानाच्या कालातीत आठवणी' (अनुवाद : विजय दिवाण), हुतोक्षी रुस्तमफ्राम व शुभदा निखार्गे यांचा 'एका लोकोद्यानाचा चिरंतन वारसा : राणीची बाग- तेव्हा आणि आता' (अनुवाद : विजय दिवाण) आणि याच जोडगोळीचा 'मुंबईचे वारसास्थान असलेल्या वनस्पती उद्यानाचे रक्षण : सेव्ह राणीबाग बोटॅनिकल गार्डन कमिटी'चा संघर्ष (अनुवाद : विजय दिवाण) या लेखांचे मथळे त्यातील विषयांची सहज कल्पना देतात. हे सर्वच लेख मुळातून वाचण्यासारखे आहेत. मार्सेलिन आलमेडांचा लेख तर आपले वनस्पतिशास्त्राचे अज्ञान दूर करून एका नितांतसुंदर विश्वाची ओळख करून देणारा आहे. त्याबद्दल माझ्यासारखे असंख्य वाचक त्यांचे जन्मभर ऋणी राहतील.

फेब्रुवारी २००७ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेने या जुन्या-पुराण्या उद्यानाच्या जागी एक तथाकथित आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्राणिसंग्रहालय तब्बल ४३३ कोटी रुपये खर्चून बांधण्याची योजना आखली; तेव्हा हुतोक्षी रुस्तमफ्राम, शुभदा निखार्गे, केटी बगली, हुतोक्षी अरेथना, डॉ.शीला तन्ना, नीलिमा कलगी व रेनी व्यास या सात निसर्गप्रेमी महिलांच्या डोक्यात धोक्याची घंटा खणखणली. कारण या विकास आराखड्यामुळे उद्यानातील सध्याचे प्राण्यांचे पिंजरे, तळी, अंतर्गत बागा व पायवाटा जमीनदोस्त होऊन त्या जागी जमिनीखालील वाहनतळ, काचेचे उपाहारगृह, हिंदी महासागराची कृत्रिम प्रतिकृती अशा हास्यास्पद योजना अमलात येणार होत्या. या कायापालटानंतर सध्याच्या पाच-दोन रुपयांसारख्या गरिबांना परवडणाऱ्या तिकिटाच्या जागी तीन-चारशे रुपये एवढा आकार भरावा लागण्याची शक्यता निर्माण झाली होती. यामुळे बहुजनांच्या मुक्त उद्यानाचे रुपांतर श्रीमंतवर्गाच्या विलासी रंजनस्थळात होणार होते. ब-२ वारसा दर्जा असलेले हे जवळजवळ १५० वर्षे जुने समृद्ध वनस्पती उद्यान वाचविण्यासाठी या महिलांनी २००७ मध्ये 'राणीबाग वनस्पती उद्यान वाचवा समिती'ची स्थापना केली. विध्वंसक विकासक व मुंबई महानगरपालिकेवर गेली पंधरा वर्षे अधिराज्य करणारे लोभी (तसेच ढोंगी) राज्यकर्ते आणि काही भ्रष्ट (तर काही बोटचेप्या) नोकरशहांच्या स्वार्थी कारस्थानाच्या विरोधात माहितीच्या अधिकाराचा परिणामकारक वापर करीत या वीरांगनांनी सतत सहा वर्षे लढा देऊन राणीची बाग अजूनपर्यंत तरी वाचवली आहे. अर्थात यापुढेही हा लढा कदाचित चालू ठेवावा लागेल, या विचाराने या समितीचे रूपांतर आता 'सेव्ह राणीबाग बोटॅनिकल गार्डन फाउंडेशन' नावाच्या सार्वजनिक न्यासात केले गेले आहे. हेच फाउंडेशन बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटी व नॅशनल सोसायटी ऑफ द फ्रेन्ड्स ऑफ द ट्रीज या संस्थांबरोबर या पुस्तकाचे सहप्रकाशक आहेत. जमनालाल बजाज फाउंडेशन, फिरोजशा गोदरेज फाउंडेशन व टाटा रिअल्टी अॅन्ड इन्फास्ट्रक्चर लि. ह्या तीन संस्थांनी दिलेल्या आर्थिक मदतीमुळे य पुस्तकाचे प्रकाशन तुलनात्मकरीत्या माफक किमतीत करणे शक्य झाले.

हे पुस्तक केवळ वनस्पती उद्यानासंबंधीचे गोड-गोड सुंदर पुस्तक नसून अगदी मोजक्या जागरूक नागरिक महिलांनी चिकाटीने केलेल्या एका शांततामय व वैधानिक संघर्षाची ही गाथा आहे, म्हणून त्याचे मोल सर्वाधिक आहे. विधायक संघर्षावर विश्वास असणाऱ्या प्रत्येक सामाजिक कार्यकर्त्यास बळ देणारे हे पुस्तक आहे. कार्यकर्त्यांनी व सामाजिक बांधिलकी मानणाऱ्या प्रत्येक सुजाण नागरिकाने हे वाचलेच पाहिजे.

गुळगुळीत कागदावर ऐश्वर्यवान रंगीत छायाचित्रे असलेल्या व मजबूत पुठ्ठा बाइंडिंगच्या कॉफी टेबलबुक स्वरूपातल्या या पुस्तकाची छापील किंमत रु. १,८०० एवढी असली तरी त्यामागच्या धर्मादाय प्रायोजकांमुळे ते रु.१,००० या किमतीत सध्या उपलब्ध आहे. ज्यांना ही रक्कम परवडेल, त्यांनी ते खरेदी करून आपल्या घरात अभिमानाने ठेवावे. हे पुस्तक महाराष्ट्रातल्या गावोगावी सार्वजनिक ग्रंथालयात पोचावे अशी याच्या प्रकाशकांची इच्छा आहे. यासाठी पुस्तकाच्या सवलतीच्या किंमतीएवढी देणगी दिल्यास देणगीदाराच्या इच्छेप्रमाणे त्याच्या नावे या पुस्तकाच्या प्रती त्या-त्या गावच्या ग्रंथालयांना पाठविण्याची योजना प्रकाशकाने आखली आहे. त्या योजनेस जागरूक नागरिकांनी भरघोस प्रतिसाद द्यावा, अशी विनंती मी करेन.

'स्थापण्या समता शांती ठेवुनी शुद्ध साधनां, करिती साधना त्यांना ठेवो उत्स्फूर्त साधना' हे जे साधनाचे माजी संपादक कविवर्य वसंत बापट यांनी लिहिलेले साधना साप्ताहिकाचे ब्रीद-वाक्य आहे, त्याचा प्रत्यय देणारे मूर्तिमंत प्रतीक असा या पुस्तकाचा गौरव मराठी भाषक करतील, यात मला तिळमात्र संशय वाटत नाही.

**प्रा. अरविंद निगळे**
२/५४, स्नेह-सागर, शिवधाम संकुल, जनरल अरुण कुमार वैद्य मार्ग, मालाड (पूर्व), मुंबई-४०० ०९७.
Mob. 900 403 1695,
arvind_nigale@yahoo.com